संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# सोहळे पुरे झाले आता कामाला लागा

गेला महिना दीड महिना सुरू असलेली निवडणुकीची धामधूम आणि जंगी शपथविधी सोहळा असा सगळा राजकीय कुंभमेळा पार पडला आहे. स्वाभाविकपणे बऱ्याच वर्षांनंतर महाराष्ट्रात सत्तांतर झाले आणि त्याहीपेक्षा भारतीय जनता पार्टीसारख्या पक्षाला पहिल्यांदाच मुख्यमंत्रीपद भूषवता आल्याने त्यांचा आनंद ओसंडत होता. परंतु नेहमीप्रमाणे अतिउत्साहाच्या भरात जे काही प्रकार घडायचे होते ते घडले. मग अगदी नव्या मुख्यमंत्र्यांची पाच वर्षांची मुलगी हरवण्यापासून ते नाना पाटेकर, काही देशाच्या राजदूतांना गर्दीमुळे परत जाण्याची वेळ आली. शपथविधीला झालेली गर्दी निव्वळ कुंभमेळ्यासारखी होती. या सगळ्या गोष्टी अधिक नियोजनपूर्वक व्यवस्था केली गेली असती तर त्या टाळता आल्या असत्या. सत्तेची सूत्रं हाती घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कामाचा अजेंडा फडकवला आहे.त्यात आधीच्या सरकारमध्ये झालेल्या घोटाळ्यांची चौकशी करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्याशिवाय राज्यातील अनेक महत्त्वाचे प्रश्न त्यातही जलसिंचन, आरोग्य, शिक्षण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारखा विषय तितक्याच गांभिर्याने सोडविण्याची त्यांची इच्छा दिसते. अर्थात आपल्याबरोबर त्यांनी सातजणांना मंत्रिमंडळात घेतले आहे. यामध्ये एकनाथ खडसे या एकमेव अनुभवी व्यक्तिशिवाय बाकी मुख्यमंत्र्यांसकट सगळ्यांनाच मंत्रीपद पहिल्यांदाच मिळत आहे.

पुढच्या काही दिवसांत मंत्रिमंडळाचा विस्तार होईल शिवसेनेला बरोबर घेऊन राज्यकारभार करण्याशिवाय फडणवीस यांच्यासमोर पर्याय नाही.स्थिर सरकार असल्याशिवाय कारभाराला गती येणार नाही हेही तितकेच खरे. अन्यथा राजकीय आणि प्रशासकीय अशा दोन्ही पातळ्यांवर फडणवीस यांची कसरत होईल. महाराष्ट्रातले हे सत्तांतर परंपरागत काँग्रेस पठडीच्या कारभाराला तिलांजली देणारे ठरले तरच त्याला काही अर्थ उरेल. अन्यथा फक्त सरकारमधली माणसे बदलली कारभार तोच राहिला असा अनुभव घेण्याची वेळ येईल. निवडणूक आणि त्यानिमित्ताने झालेली सगळी औपचारिकता आता संपली आहे. आता प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात झाली पाहिजे आणि त्याचे परिणाम लोकांना जाणवले पाहिजेत. कारण लोकांना केवळ सत्ताबदल अपेक्षित नसून प्रत्यक्ष नोकरशाहीच्या ढिसाळ कारभारामध्ये वेग हवा आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आतापर्यंतच्या राज्यकर्त्यांनी निर्माण केलेले भ्रष्टाचार म्हणजेच राज्यकारभार ही प्रतिमा बदलावी लागेल.

## तरुणांचा मोठा सहभाग

फडणवीस यांच्या नव्या मंत्रिमंडळात एकनाथ खडसे यांची वर्णी लागणे अनिवार्य होते. याशिवाय विनोद तावडे यांनी गेल्या काही वर्षांत आपल्या विविध प्रकारच्या कामांमधून स्वत:चे स्थान निर्माण केल्यामुळे त्यांच्याकडे मंत्रिमंडळातले खाते सोपवले जाऊ शकते. चंद्रकांत पाटील या विद्यार्थी परिषदेचे प्रचारक राहिलेल्या संघटनात्मक कामाचा दांडगा अनुभव असलेल्या नेत्याला स्थान मिळाल्यामुळे थोडा वेगळेपणा जाणवू शकतो. पंकजा मुंडे यांचादेखील मंत्रिमंडळातला सहभाग तसा अनिवार्यच होता. देवेंद्र फडणवीस स्वत: हे तरुण वयात मुख्यमंत्री होत आहेत त्यांच्या मंत्रिमंडळात तरुणांचा समावेश असेल असे म्हणायला हरकत नाही. अजून किमान वीस जणांचा नव्याने समावेश होऊ शकतो. शिवसेनेला काही मंत्रीपदे द्यावी लागतील आणि या सर्वांची मिळून फडणवीस यांची जी काही टीम तयार होईल त्यातून नवा महाराष्ट्र घडवण्याचे आव्हान फडणवीस यांच्या सरकारला पेलावे लागणार आहेत.

आज महाराष्ट्रात परिवर्तन घडत नाही हीच मोठी समस्या ठरली आहे. म्हणूनच केवळ सत्तापरिवर्तनाने सगळे प्रश्न सुटतील असे नाही. जो राज्यकर्त्यांची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत समस्या सुटू शकत नाही. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पक्षाने सरकार चालवताना सत्ता उपभोगण्याचीच राज्यकर्त्यांना सवय लावली. जनता आपल्याला समाजसेवा करण्यासाठी संधी देत असते. देशाचा, राज्याचा किंवा एकूण समाजाचा विकास घडावा यासाठी सत्ता नावाचे माध्यम उपलब्ध असते. दुर्दैवाने त्याचा विपरित अर्थ केला गेला आणि सत्ता म्हणजे रुबाब गाजवण्याचे एकमेव ठिकाण आणि आपण ठरवू तशाच सगळ्या गोष्टी झाल्या पाहिजेत अशा प्रकारची हुकूमशाही वृत्ती लोकशाहीच्या गोंडस नावाखाली वाढत गेली.

प्रामुख्याने अनेक वर्षे काँग्रेसला पूर्ण बहुमत मिळाल्यामुळे ते बहुमत हुकूमशाही प्रवृत्तीकडे नेणारे ठरले. त्यामुळे सत्तेचे सामाजिक परिवर्तनामध्ये रूपांतरच होऊ शकले नाही. ठरावीक मंडळींच्या स्वार्थासाठी सत्तेचा उपयोग झाला अजूनही हीच वृत्ती अनेक राजकीय पक्षामध्ये कायम आहे. भारतीय जनता पार्टीसुध्दा त्यातून सुटलेली नाही. खरे तर या शपथविधीच्या निमित्ताने सामान्य माणसाला आपुलकी वाटेल अशा प्रकारच्या साधेपणाने हा सोहळा साजरा करता आला असता. आणि आपण सगळे एकच आहोत, सरकार जनतेचे आहे आणि जनतेच्या बरोबर राहणार आहे अशी ग्वाही देता आली असती. ती संधी भाजपाने गमावली. इतका दिमाख दाखवणारे हे सरकार नेमके अपेक्षेप्रमाणे काम करेल की नाही याबद्दल लोकांना अजून खात्री वाटत नाही.

## लोकशाहीतल्या राजेशाहीचेच प्रदर्शन

आपल्याकडे लोकशाही व्यवस्थेचे फार गोडवे गायले जातात. परंतु ही लोकशाही राजकारण्यांची राजेशाही निर्माण करणारी ठरली आहे. लोकांनी फक्त यांचे सोहळे पाहण्याचेच काम करावे आणि त्यांच्या जिंदाबादच्याच घोषणा द्याव्यात. अशी त्या लोकांची अपेक्षा असते आणि तसाच व्यवहारही घडत राहतो. या चौकटीबध्द आणि स्वार्थी प्रवृत्तीचा मिजास असणारी राज्यपध्दती मोडून काढली पाहिजे. थेट जनतेशी संवाद साधणारी, जनतेचा सहभाग मान्य करणारी, जनतेमध्ये आपलेपणा निर्माण करणारी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. परंतु तशी ती होऊ दिली जाणार नाही कारण त्यातून राजकारण्यांचे महत्त्व कमी होण्याची शक्यता असते. त्यांच्या मग्रुरीला चाप बसू शकतो. आज नरेंद्र मोदी यांनी कितीही कंठशोष करून आपण प्रधानसेवक आहोत असे म्हटले असले तरी त्यांच्याकडून अजूनही सेवकासारखा साधेपणा व्यक्त होताना दिसत नाही.जो साधेपणा यापूर्वी फक्त लालबहादूर शास्त्री यांच्यामध्ये पहायला मिळाला होता. तशी आजच्या राज्यकर्त्यांमध्ये प्रवृत्ती निर्माण करण्यासाठी खऱ्या लोकशाहीचा आग्रह धरावा लागेल महाराष्ट्रातून त्याची सुरुवात व्हायला हरकत नाही.